# जनसंपर्क विभाग

**जळगाव दि. १८ (प्रतिनीधी) :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया (ICSI) यांच्या दरम्यान सामंजस्य करार करण्यात आला.

या कराराप्रसंगी आयसीएसआय, औरंगाबाद चाप्टरच्या अध्यक्षा सीएस समृध्दी लुणावत, सचिव सीएस अनिकेत कुलकर्णी, पूर्व अध्यक्ष सीएस परेश देशपांडे, औरंगाबाद चाप्टर प्रभारी सुभाष सिन्हा, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, नवोपक्रम नवसंशोधन साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. राजेश जावळेकर यांची उपस्थिती होती.

आयसीएसआय बरोबर झालेल्या ह्या सामंजस्य कराराचा फायदा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व विद्यार्थी तसेच शिक्षक यांना होणार आहे. या करारामुळे विद्यार्थ्यांना कंपनी सचिव अभ्यासक्रमाबद्दलची सर्व माहिती विद्यापीठामध्ये उपलब्ध होणार आहे. तसेच या करारा अंतर्गत विद्यापीठातील विद्यार्थ्यांना सुवर्णपदक व स्वाक्षरी पुरस्कार देण्यात येईल, प्रथम तीन उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सीएस कोर्स करण्यासाठी नोंदणी शुल्क माफ करण्यात येईल. विद्यापीठामध्ये ग्रंथालय सुविधा योजना, शिक्षक विकास कार्यशाळा आयसीएसआय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभाग घेता येणार आहे.

**बातमी नं. २**

**जळगाव दि. १८ (प्रतिनीधी) :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठतील शिक्षणशास्त्र प्रशाळेत संशोधन पेपर लेखन आणि शैक्षणिक तंत्रज्ञानाचे उपयोजन या दोन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुरवात करण्यात आलेली आहे.

पदव्युत्तर स्तरावरील शिक्षणात संशोधन विषयास महत्त्व असल्यामुळे विद्यार्थी, शिक्षक, अभ्यासक आणि संशोधक यांना शोध निबंध लेखनासंदर्भात शास्त्रीय ज्ञान प्राप्त व्हावे तसेच त्यांची संशोधनासंदर्भातील वैज्ञानिक दृष्टी विकसित व्हावी यासाठी. “संशोधन पेपर लेखन” या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुरवात करण्यात आलेली आहे. हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम दोन महिने कालावधीचा आहे. यात प्रवेशित विद्यार्थ्यांना संशोधन पेपर लेखन कसे करावे या बद्दल माहिती दिली जाणार आहे. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क मात्र १०००/- रुपये आहे. याचे वर्ग ऑनलाईन पध्दतीने शनिवार आणि रविवारी घेतले जातील.

तसेच आजचा विचार करता इंटरनेट व मोबाईलच्या वापरामुळे शिक्षण क्षेत्र अतिशय प्रभावित झालेले आहे. सोबतच कोविड-१९ च्या परिस्थितीतील अनुभव बघता विद्यार्थी, शिक्षक, अभ्यासक आणि संशोधक यांना तंत्रज्ञानाभिमुख बनवून त्यांना तंत्रज्ञानाच्या शैक्षणिक उपयोजना संदर्भात जागरूक करून त्यांना आवश्यक कौशल्य संपादनासाठी सहाय्यक होईल यासाठी “शैक्षणिक तंत्रज्ञानाचे उपयोजन” या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुरवात करण्यात आलेली आहे. या अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क रू. १५००/- असून हा अभ्यासक्रम ब्लेंडेड मोडने सुरु राहिल. या दोनही प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली असून या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास इच्छुक असणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक, अभ्यासक आणि संशोधक यांनी विद्यापीठाच्या वेबसाईटला भेट देऊन प्रवेश निश्चित करण्याचे व या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मनीषा इंदाणी यांच्या मार्फत करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी डॉ. स्वाती तायडे (मो.नं. ९३०७४४५०६४) आणि डॉ. रणजीत पारधे (मो. ८९८३१२२९८०) यांच्याशी संपर्क करावा.

**बातमी नं. ३**

**जळगाव दि. १८ (प्रतिनीधी) :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास मराठी विभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवाड्याचे आयोजन करण्यात आले असून त्याचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांचे कवीसंमेलन घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. म.सु. पगारे होते.

आजच्या कवी संमेलनात प्रशाळेतील काही विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदवला. यात आकाश कांगळे या विद्यार्थ्याने 'खेळ हा माझा', मयुरी सोनवणे हिने 'आत्मभान' , महेश सूर्यवंशी याने सत्यशोधक, सचिन माळी यांची 'जीवनसाथी' आणि नारायण पुरी यांची 'प्रेमाची जांगड-गुत्ता' तर धवल सूर्यवंशी यांनी 'भारत देशावर' या कविता सादर केल्या. तसेच प्रा. कृष्णा संदांनशीव यांनी नामदेव ढसाळांची 'रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यानो....' व 'नर्गिस' ह्या कवितेचे वाचन केले. प्रा.डॉ. सुदर्शन भवरे यांनी 'लास्टीन हुसेन' स्वत: अनुवादित केलेल्या कवितांचे वाचन केले. प्रा.डॉ. दीपक खरात यांनी बाबुरा बागुलांची 'वेदाआधी तू होतास' तर प्रा.योगेश शिंदे यांनी वि.दा. करंदीकरांची 'चुकली दिशा तरीही' इ. कविता सादर करण्यात आल्या.

# जनसंपर्क विभाग

अध्यक्षीय मनोगतात प्रा.म.सु. पगारे यांनी काव्यवाचनाविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. दीपक खरात यांनी प्रास्ताविक तर आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन निशा सपकाळे या विद्यार्थिनीने केले.

**बातमी नं. ४**

**जळगाव दि. १८ (प्रतिनीधी) :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस मधील व्हिजीटिंग प्रोफेसर म्हणून कार्य केलेले प्रा.के.जे. पाटील यांचे दुःखद निधन झाले. या विभागात प्रा. पाटील सप्टेंबर २००७ पासून जून २०१९ पर्यंत १२ वर्ष व्हिजीटिंग प्रोफेसर म्हणून कार्यरत होते.

त्याआधी प्रा. पाटील शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे रसायनशास्त्र विभागात प्राध्यापक , विभागप्रमुख होते. तसेच त्यांनी विद्यापीठातील शास्त्रीय उपकरणे केंद्राचे प्रमुख म्हणूनही काम केले होते. प्रा. पाटील हे उत्कृष्ट शिक्षक आणि संशोधक म्हणून ख्याती असेलेले व्यक्तीमत्व होते. त्यांना ४८ वर्षे संशोधनाचा अनुभव होता आणि त्यापेक्षा जास्त काळ त्यांनी अध्यापनाचे काम केले होते. त्यांना जागतिक स्तरावरील (आंतराष्ट्रीय) प्रितिष्ठीत समजल्या जाणाऱ्या जर्मनीच्या डॅड आणि हॅम्बोल्ड येथील संशोधन फेलोशिप मिळाल्या होत्या.

प्रा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठात २१ आणि कबचौउमवि मध्ये ४ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी पूर्ण केली आहे. त्यांचे एकून १३९ शोध निबंध प्रकाशित झाले असून त्यापैकी १०५ हे आंतरराष्ट्रीय जर्नल्स मध्ये आणि ३४ हे राष्ट्रीय जर्नल्स मध्ये प्रकाशित झाले आहेत. प्रा. पाटील अमेरिकन केमिकल सोसायटी आणि इंडियन थर्मोडायनामिक सोसायटीचे सदस्य होते. शिवाजी विद्यापीठाने त्यांना १९९८ साली प्रा. पाटील यांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्काराने सन्मानित केले होते.

प्रा. पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे स्कुलऑफ केमिकल सायन्सेस मधील संशोधनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवीन आयाम प्राप्त झाला. तसेच संशोधनाची गुणवत्ता चांगली व्हायला मदत झाली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: १८ जानेवारी, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी